सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठित झालेल्या शासकीय कर्मचा-यांना कमाल वेतनोत्तर वेतनवाढी मंजूर करणे.

आगाऊ वेतनवाढीच्या दिनांकाबाबत परिगणना.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक:- वेतन ११९२/प्रकरण क्र.५/९२/सेवा-३,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जानेवारी १९९२.

वाचा :- १] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८८/५७९/सेवा-१०, दिनांक १४ ऑक्टोबर १९८८.

२] शासन परिपत्रक, क्रमांक: वेपुर-१२८९/१३२/सेवा-१०, दिनांक १५ सप्टेंबर, १९८९.

३] शासन परिपत्रक, क्रमांक:- वेतन १०९०/प्र.क्र.७६/९०/सेवा-३, दिनांक ३ डिसेंबर १९९०.

शासन परिपत्रक :- महाराष्ट्र नागरी सेवा [सुधारीत वेतन] नियम, १९८८ प्रमाणे दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर कुंठित होणा-या कर्मचा-यांसाठी कमाल वेतनोत्तर वेतनवाढीची तरतूद शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १४ ऑक्टोबर १९८८ च्या आदेशात करण्यात आलेली आहे. या आदेशान्वये ज्या शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीची कमाल मर्यादा रु.६,७००/- पेक्षा अधिक नसेल आणि जे त्यांच्या सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर पोहोचतील त्यांना त्यांच्या संबंधित वेतन श्रेणीच्या कमाल टप्प्यावर दर दोन वर्षे पूर्ण केल्यानंतर एक कमाल वेतनोत्तर वेतनवाढ मंजूर करण्यात येते. ज्या कर्मचा-यांना उत्कृष्ट कामासाठी आगाऊ वेतनवाढ [वाढी] मंजूर करण्यात येते ती आगाऊ वेतनवाढ [वाढी] दिनांक १ ऑक्टोबर रोजी दिली जाते. ही आगाऊ वेतनवाढ[वाढी] मंजूर करण्यामुळे जो कर्मचारी सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर पोहचतो आणि त्याचा जर तो [दिनांक १ ऑक्टोबर] नियमित वेतनवाढीचा दिनांक नसेल तर अशा कर्मचा-यांच्या बाबतीत कमाल वेतनोत्तर वेतनवाढ मंजूर करण्यासाठी दोन वर्षांच्या कालावधीची परिगणना कोणत्या दिनांकापासून करावी असा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन असा आदेश देत आहे की, अशा प्रकरणात ही दोन वर्षांच्या कालावधीची परिगणना आगाऊ वेतनवाढीच्या दिनांकानंतर येणा-या लगतच्या नियमित वेतनवाढीच्या दिनांकापासून करण्यात यावी.

अधिक स्पष्टीकरणासाठी खाली उदाहरण देण्यात येत आहे :

उदा. रु.१४००-४०-१८०० दरो-५०-२३०० या वेतनश्रेणीत शासकीय कर्मचारी दिनांक १ मे, १९८८ पासून रु.२२०० इतके वेतन घेत आहे. त्याला दिनांक १ ऑक्टोबर १९८८ पासून उत्कृष्ट कामासाठी दोन आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या आहेत. त्याला वरील आदेशानुसार कुंठीत वेतनवाढ दिनांक <u>१ मे १९९१</u> पासून देय होईल ती अशी :

दिनांक १-५-१९८८	रु.२२००
दिनांक १-१०-१९८८	रु.२३०० [दोन आगाऊ वेतनवाढी देऊन कमाल टप्प्यावर येतो]
दिनांक १-५-१९८९	कुंठीत झाल्याचे मानण्यात यावे.
दिनांक १-५-१९९१	रु.२३००+५० वै. वेतन [कुंठीत वेतनवाढ]

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मंगला मं. [illegible]कर,
[illegible] सचिव, महाराष्ट्र शासन.

[कृ.मा.प.]

शा.म.मु. रोटा/रप-८६४[१५,०००/१०-१-९२]

प्रति

महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ [लेखापरीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखापरीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख, प्रादेशिक प्रमुख व कार्यालय प्रमुख,
x प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
x प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
x प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय [व्यय विभाग], खोली क्रमांक २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, सेवा-३.

---

x पत्राद्वारे.

एच-८६४[१५,०००]-१०-३-९३]-अ